औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची सोमवार दि. २९.४.९१ रोजी झालेल्या ६१ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

मंडळाची ६१ वी बैठक पूर्वनियोजित वेळेनुसार सुरू झाली परंतु सभा कोरम अभावी तहकूब करून अर्धा तासानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांत आली.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१. मा.श्री.ईश्वर भोसीकर सभापती/औरंगाबाद मंडळ
२. मा.श्री.अरविंद महाजन उपसभापती/औरंगाबाद मंडळ.

विशेष आमंत्रीत म्हणून प्राधिकरणाचे मुख्य अभियंता मा.श्री.मान्नीकर उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी मंडळाच्या ६० व्या सभेतील ठराव क्र.३६० च्या अनुषंगाने अशी सुचना केली की, मंडळाने "क" वर्ग नगरपरिषदेच्या ठिकाणी, गृहनिर्माण योजना राबवावयाच्या आहेत अशा नगरपरिषदेच्या नांवाचा उल्लेख करावा. यावर उपसभापती यांनी सांगितले की, निलंगा, लोहा, मुखेड, देगलूर, कंधार या "क" वर्ग नगरपरिषदेच्या ठिकाणीच गृहनिर्माण योजना राबवावयाची आहे.

या अनुषंगाने मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी अशी सुचना केली की, वरील ठिकाणी योजना राबवितांना नगरपरिषदेवर बाहयसुविधाची जबाबदारी टाकू नये, सर्व बाहयसुविधांचा खर्च योजनेच्या अंदाजपत्रकातच समाविष्ट करावा व मंडळानेच या सुविधा स्वत: द्याव्यात. कारण यापूर्वी काही न.प.ने बाहयसुविधा देण्याचे ठराव करून देखील मंडळाच्या वसाहतींना सुविधा पुरविलेल्या नाहीत असा अनुभव आहे.

विषय क्र.१: दिनांक २६.३.९१ रोजी झालेल्या ६० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

. . . .

मंडळाच्या ६० व्या बैठकीतील विषय क्र.५ [२] आयत्यावेळचा विषय ठराव क्र.३६५ वर चर्चा करतांना मा.मुख्य अभियंता/प्राधिकरण यांनी विचारले की, इतका जास्त दर का प्राप्त झाला आहे. यावर उपसभापती/औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, याच कामासाठी

दोन वेळा निविदा बोलविल्या होत्या. त्यात सर्वात जास्त दर देणारी निविदा ४९% जादाची होती. नासिक येथे सध्या सिंहस्थ मेळाव्याचे काम चालु आहे. त्यामुळे नासिक मध्ये मजूरीचे दर व बांधकाम साहित्याच्या दरात फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच पेट्रोल व डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे ही फार मोठा परिणाम झालेला असे उपसभापतींनी सांगितले. तथापी ठेकेदारास दर कमी करण्याचे सांगण्यात आले असून त्यांनी आता ३२% जास्त असा वाटाघाटीनंतर दर दिलेला आहे.

ठराव क्र. ३६६

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने दिनांक २६.३.९१ रोजी झालेल्या ६० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: नासिक येथील मजूरवाडी व अवधुतवाडी या झोपडपट्टीच्या सुधारणा योजनांच्या प्रशासकीय मान्यता नियमित करणेबाबत.

नासिक महानगरपालिकेकडून मजूरवाडी व अवधुतवाडी या झोपडपट्टीच्या सुधारणा योजनांच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळावी म्हणून प्रस्ताव मंडळाकडे प्राप्त झाले होते.

नासिक जिल्हा नियोजन व विकास मंडळाने नासिक शहरासाठी झोपडपट्टी सुधारणा कामासाठी रु. ५.७५ लक्षची तरतुद केली होती व १५ मार्च १९९१ पावेतो नासिक महानगरपालिकेने रु. १.९२ लक्ष खर्च केला होता. संपूर्ण तरतुद खर्च होण्याच्या अनुषंगाने योग्य ते प्रयत्न महानगरपालिकेकडून वेळीच करण्यांत आले नव्हते. त्यामुळे सदर रक्कम व्यपगत [ Lapse ] होण्याची शक्यता होती म्हणून मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी नासिक महानगरपालिकेकडून आलेल्या मजूरवाडी व अवधुतवाडी या झोपडपट्टयांच्या कामांना मंडळाची कार्योत्तर मंजूरी गृहीत धरून प्रशासकीय मान्यता दिली व त्या कार्यवाहीस नियमित करावी म्हणून प्रस्ताव मंडळासमोर सादर केल्याचे उपसभापतींनी मंडळास सांगितले.

ठराव क्र. ३६७

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने, मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मजूरवाडी व अवधुतवाडी या झोपडपट्ट्यांच्या सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली त्यास मंडळ कार्योत्तर मंजूरी प्रदान करीत आहे.

विषय क्र. ३: औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मासिक बैठकीत उपस्थित राहण्यापासून सुट मिळणेबाबत.

ठराव क्र. ३६८

विभागीय आयुक्त औरंगाबाद/नासिक यांना त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे मंडळाच्या सदस्यात्वातून शासनाने मुक्त केल्याची मंडळाने नोंद घेतली व त्यांनी मंडळाला आतापर्यन्त केलेल्या मार्गदर्शनाचा व सहकार्याची प्रशंसा करून कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी मंडळाचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने प्रसंगप्राप्त मार्गदर्शन ह्यापुढेही करावे अशी मंडळातर्फे त्यांना विनंती करण्यात यावी असा मंडळाने निर्णय घेतला.

विषय क्र. ४: औरंगाबाद मंडळाने, गृहनिर्माण भवनाजवळ उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजने अंतर्गत बांधलेल्या गाळ्यांच्या वाटपाबाबत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, गृहनिर्माण भवनाजवळील जमिनीवर मंडळाने १२८ गाळे उच्च उत्पन्न गटाची योजना कार्यान्वीत करण्याचे ठरविले होते. परंतु जमिनीच्या काही भागावर जमिन मालकांनी न्यायालयातून स्थगिती आणली त्यामुळे फक्त १६ गाळ्याच्या कामाची योजना मंडळास कार्यान्वीत करता आली. पण ठेकेदाराने हे काम बंद करून अपूर्ण ठेवले. जवळच्या जमिनीवर मंडळाने ३२ गाळ्याची एक योजना घेऊन नुकतीच पूर्ण केली आहे व २४ गाळ्याची एक नविन योजनेचे बांधकामास सुरुवात केली आहे. त्यामुळे १२८ गाळ्यांची योजना फक्त ७२ गाळ्या पर्यन्त सीमित झालेली आहे.

३२ गाळ्यांची विक्री किंमत रु. १,७६,५००/– इतकी निश्चीत झाली आहे. मात्र ज्या इतर १६ गाळ्याचे बांधकाम स्थगित आहे व दुसऱ्या २४ गाळ्याचे काम नुकतेच सुरु झाले आहे, त्यांची किंमत ही रु. १,७६,५००/– पेक्षा जास्त राहील. उपरोक्त परिस्थितीत [ म्हणजे गाळ्यांची कमी झालेली संख्या व ज्या गाळ्याचे काम अपूर्ण आहे किंवा ज्याचे बांधकाम चालु आहे अश्या गाळ्यासाठी आकारावी लागणारी वाढीव किंमत] असा प्रस्ताव आहे की, संबंधीत अर्जदारांना ह्या परिस्थितीची कल्पना देऊन विचाराधीन असलेल्या अर्जाची पात्रता ठरवून व जसजसे गाळे उपलब्ध होतील त्या त्या गाळ्याचे वाटप त्या गाळ्याच्या किंमतीनुसार वरील अनुक्रमाप्रमाणे करण्यांत यावे असा प्रस्ताव असल्याचे उपसभापतींनी सांगितले.

यापुढे उपसभापतींनी सांगितले की, उच्च उत्पन्न गट योजनेतील काही गाळे माजी सैनिकासाठी निवासस्थान म्हणून उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी जिल्हा सैनिक मंडळ यांच्याकडून करण्यांत आलेली आहे. परंतु सदरची मागणी वरील परिस्थितीमुळे पूर्ण करणे शक्य होत नसल्याचे उपसभापतींनी मंडळास सांगितले. जर वाढीव किंमतीमुळे अर्जदारांनी घरे घेतले नाही तर मागणीचा विचार करणे शक्य होईल याची कल्पना मंडळास दिली.

ठराव क्र. ३६९

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, मंडळाकडे उपलब्ध असलेल्या अर्जदारांची पात्रता निश्चीत करुन सोडत काढावी व वाटपासाठी सध्या तयार असलेल्या ३२ गाळ्याचे क्रमानुसार वाटप करावे व वाटपा अगोदर गाळ्यांची वाढलेली किंमत व इतर बाबीबाबत अर्जदारास कळवावे व अर्जदाराची सम्मती घ्यावी. तसेच वाटपानंतर प्रतिक्षा यादीवर असलेल्या अर्जदारांना स्थगित असलेल्या गाळ्याचे काम व चालु असलेल्या गाळ्याचे काम जेंव्हा पूर्ण होईल तेंव्हा गाळ्यांच्या वाढीव किंमतीनुसार वाटप करण्यांत यावे.

गाळ्यांच्या वाढीव किंमतीनुसार अर्जदारांनी गाळे घेतले नाही तर जिल्हा सैनिक मंडळाने, माजी सैनिकांच्या निवासस्थानासाठी मागणी केलेल्या गाळ्यांच्या वाटपाबाबत विचार करता येईल असे कळवावे.